# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**विधान भवन, मुंबई येथील उंच व गोल इमारतीतील फर्निचरवर पेंटर/अक्षरलेखक (प्रति नग (Item) अक्षरलेखनाचा खर्च (रंगा सहित) किंवा Lump sum contract) याची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती याकरिता या क्षेत्रातील ठेकेदार/पुरवठादार नियुक्त करणे संदर्भात...**

विधान भवन येथील सचिवालयास फर्निचर तसेच विविध तांत्रिक उपकरणे हस्तांतरित करण्यात येतात. सदर साहित्याची अधिकृत नोंदणी आणि भविष्यातील देखभाल-दुरुस्ती सुलभ व्हावी, याकरिता त्यावर कार्यालयाचे नाव (म.वि.स./दा.क्र.--/ --कक्ष) किंवा विशिष्ट सांकेतिक क्रमांक (Dead Stock Number) टाकणे आवश्यक आहे. याबाबत सदर काम विशिष्ट स्वरूपाचे आणि सुबक अक्षरलेखनाचे असल्याने, या कामासाठी अनुभवी पेंटर/अक्षरलेखक याची तात्पुरत्या स्वरूपात (प्रति नग (Item) अक्षरलेखनाचा खर्च (ब्रश,रंग सहित) किंवा Lump sum contract) नियुक्ती करण्याकरिता स्थानिक अनुभवी पेंटर/ अक्षरलेखक प्राधान्य देण्यात येईल.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेल्या फर्निचर आणि उपकरणांवर सांकेतिक क्रमांक (Dead Stock Number) टाकण्याकरिता दरपत्रक भरण्यापूर्वी कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ शाखा, कक्ष क्र.०१७, तळ मजला, विधान भवन, मुंबई यांच्याशी संपर्क साधून विधान भवन, इमारतीची प्रत्यक्ष पहाणी करावी तसेच वार्षिक देखभालकरिता GST सह दर नमूद करून दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्यावर दिनांक २५ मे, २०२६ रोजी किंवा तत्पुर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणांस कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्वीकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**